पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ७०**

(सभावृत्तांत)

दिनांक – ०४/०७/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०४/०७/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.खोराटे, मा.झगडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण

विभाग) मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट, मा.लटपटे – प्रशा.अधिकारी, मा.कोटलवार – माहिती तंत्रज्ञान अधिकारी, मा.माने - पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.विलास मडिगेरी                अनुमोदक - मा.सागर आंगोळकर

१) धुळे जिल्यातील साक्री हत्याकांडामद्ये ५ जनांचे निधन झाले असल्याने

२) उत्तरांखंडमध्ये बस दरीत कोसळून ४७ मृत्युमुखी पडलेल्या सर्वांना श्रध्दांजली वाहुन आजची सभा बुधवार दिनांक ११/७/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सभापती** - आजची सभा बुधवार दिनांक ११/७/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७०**
(सभावृत्तांत)
**(दिनांक ०४/०७/२०१८ ची तहकूब सभा)**

दिनांक – ११/०७/२०१८ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.४/७/२०१८ ची तहकूब सभा बुधवार, दिनांक ११/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी, - मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत, मा.

लोणकर, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार –प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.राजेंद्र गावडे                अनुमोदक - मा.सागर आंगोळकर

मा.सभापती, दि.११/७/२०१८ ची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १८/७/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.सभापती** - आजची सभा बुधवार दिनांक १८/७/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७०**
(सभावृत्तांत)
**(दिनांक ४/७/२०१८ व ११/०७/२०१८ दु. १.०० वा. ची तहकूब सभा)**

दिनांक – १८/०७/२०१८ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.११/७/२०१८ दुपारी १.०० वा. ची तहकूब सभा बुधवार, दिनांक १८/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.झगडे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार

– प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट– प्रशा.अधिकारी, मा.झनकर – लेखाधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक - मा.सागर आंगोळकर

मा.सभापती, मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.७०) मध्ये महत्वाचे विषय असल्याने चर्चेकामी ही सभा मा.स्थायी समिती (कार्यपत्रिका क्र.७१) व (कार्यपत्रिका क्र.७२) चे सभे नंतर घेणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

--------

**मा.सभापती -** उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीने अनुक्रमे सभा क्र.७१, ७२ आणि शेवटी सभा क्र.७० या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत याव्यात.

--------

**खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक - मा.सागर आंगोळकर

मा.सभापती, कार्यपत्रिका क्र.७० मधील विषय क्र.१ ते ३ व विषय क्र.५ ते ३७ आणि शेवटी विषय क्र.४ या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत याव्यात.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

--------

**मा.सभापती** - उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीने कार्यपत्रिका क्र.७० मधील अनुक्रमे विषय क्र.१ ते ३ व विषय क्र.५ ते ३७ आणि शेवटी विषय क्र.४ या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेण्यात याव्यात.

--------

दिनांक २७/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ६९)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -२९२५ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

बँक ऑफ बडोदा, पिंपरी चिंचवड विस्तारित शाखा येथे दि.२३/५/२०१८ अखेर आधार निधी खाते क्र.३१०६०२००००००००९ खात्यावर र.रू.१८,१६,०८,३९५/- (अक्षरी र.रू.अठरा कोटी सोळा लाख आठ हजार तीनशे पंच्याण्णव फक्त) शिल्लक आहेत. तसेच मागासवर्गीय कल्याणकारी निधी खाते क्र.३१०६०२०००००००१२ मध्ये र.रू.३,२७,५३४५५/- (अक्षरी र.रू.तीन कोटी सत्तावीस लाख त्रेपन्न हजार चारशे पंचावन्न फक्त) शिल्लक आहेत. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधीमध्ये मागील ३ वर्षामध्ये कुठलाही खर्च झालेला नाही. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी बंद करण्यात येईल व उपलब्ध शिल्लक निधी सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करण्यात येईल. सदर खात्यांवरील रकमांना FFD सुविधा असल्याने रोजची शिल्लक रक्कम बदलत असते. तरी सदर खात्यामधील रक्कम वर्ग करण्याच्या दिवशी मुदतठेव, मुदतठेवीवरील व्याज व जो Effective Balance असेल ती शिल्लक ग्राह्य धरण्यात येऊन शिल्लक सर्वसाधारण निधीकडे वर्ग करण्यात येईल. तरी आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी ही दोन्ही निधी बंद करून सदर निधीच्या खात्यावरील उपलब्ध शिल्लक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ६ परिशिष्ट ड नियम (३) ३ अन्वये सर्वसाधारण निधीमध्ये जमा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दफ्तरी दाखल करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९२६ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/०६/कावि/२४७/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध प्रकारचे केबल्स आणि वायर्स साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.38/2/2017-18 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण चार निविदाकार प्राप्त झाले. निविदेतील प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.पायोनियर सेल्स यांचे प्राप्त लघुत्तम बाब क्र.1,3,4 व 5 याप्रमाणे एकुण 04 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.36,65,000/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.95% ने कमी असल्याने व मे.रूपलक्ष्मी इलेकट्रील्स यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र.2 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.54,68,000/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.15% ने कमी असल्याने तसेच मे.हायटेक इलेक्ट्रीकल्स यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र.6 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.52,97,500/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.05% ने कमी असल्याने याप्रमाणे सदर एकुण लघुत्तम दर बाब क्र.1,2,3,4,5 व 6 या सर्व साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.1,44,30,500/- (अक्षरी र.रू.एक कोटी चव्वेचाळीस लाख तीस हजार पाचशे फक्त) हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.31% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९२७ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.नम्रदा लोंढे अनुमोदक – मा.सरिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मऔभां/१/कावि/७९/२०१८ दि.१५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दवाखाने/रूग्णालयांसाठी औषधे/साहित्य खरेदीकामी औषधे निविदा समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीने शिफ़ारस केलेनुसार दवाखाने/ रूग्णालयांसाठी आवश्यकतेनूसार व तातडीने औषधे/ साहित्य खरेदी करणेकामी क्र.२/१,२,३,४/ २०१६-२०१८ अन्वये निवीदा मागविण्यास आल्या होत्या. यामध्ये Allopathic medicine purchase - 809 Items, Surgical Items -449, Ayurvedic medicine-198 Items, Dental Items 211 या प्रमाणे एकुण 1667 Items औषधे/साहित्याचा समावेश होता.सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात औषधे/ साहित्य

खरेदीपोटी जादा झालेल्या र.रु.७५,४०,५८१/- (अक्षरी र.रू. पंचाहत्तर लाख चाळीस हजार पाचशे एक्याऐंशी फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी आवश्यकतेनूसार औषधे/ साहित्य खरेदीकरणे कामी र.रु.११.५० कोटी खर्चास अथवा सुधारित अंदाजपत्रकात करण्यात येणा-या तरतुदीचे मर्यादेत होणा-या प्रत्यक्ष खरेदी खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९२८ विषय क्रमांक - ०५

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– नगररचना व विकास विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि-१०/४७६/२०१८ दि.२०/०६/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मौजे आकुर्डी येथील मंजुर सुधारित विकास योजनेतील स.नं.१३७/१ पैकी उत्तर-दक्षिण १५.०० मी.रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र खाजगी वाटा घाटीने ताब्यात देणेबाबतची मागणी प्रस्तावात नमूद संदर्भ क्र.१ अन्वये अर्जदार श्री.राम भिमाशंकर काळे यांनी केलेली आहे. सदर पत्रानुसार बाधीत मिळकतीचा मोबदला चालु दरसुचीनुसार १००% दिलासा रक्कमेसह मिळणेची मागणी केली आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद संदर्भ क्र.२ नुसार सादर केलेल्या मंजूर टिपणीनुसार अर्जदार श्री.राम भिमाशंकर काळे यांनी मौंजे आकुर्डी येथील स.नं.१३७/१ पैकी, मधील मंजूर विकास योजनेतील १५ मी रस्त्याने बाधित क्षेत्र २४.०० चौ मी क्षेत्राचा खाजगी वाटाघाटीने ताबा घेणेस व ताब्यात येणा-या क्षेत्राचा मोबदला (१००% दिलासा रक्कमे सह) मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४, दि.२०/११/२०१५ व मा. महापालिका सभा ठराव क्र ९१५, दि.२९/०८/२०१६ नुसार अदा करणेस व सन २०१७-१८ चे शीघ्र शुद्ध गणक दर सुचीनुसार र.रू.१२३६०/- प्रति चौ मी प्रमाणे येणारे मुल्यांकन र.रू.५,९३,२८०/- ला मा. आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली आहे. तदनंतर प्रस्तुत प्रकरणी उक्त बाधीत क्षेत्र मनपाचे ताब्यात घेणेकामी मालकी हक्काबाबत शहानिशा करणेकामी मा. उपसंचालक, नगररचना यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार जाहीर नोटीशीस मान्यता देण्यात आली होती. प्रसिध्द केलेल्या जाहिर नोटीशीस हरकत प्राप्त झालेली नाही. सदर बाबत कायदा विभागाने प्रस्तावात नमूद संदर्भ क्र.३ अन्वये दिनांक ०८/०२/२०१८ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचा अभिप्राय दिला आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद संदर्भ क्र.४ अन्वये दि. २१/०३/२०१८ रोजी सदरचा विषय मा.खाजगी वाटाघाटी समिती समोर ठेवला असता मा. खाजगी वाटाघाटी समितीने,सन २०१७-२०१८ चे रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन व मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०।११।२०१५ व ठराव ९१५ दि.२९।०८।२०१६ नुसार देय होणारी १००% दिलासा रक्कम अशी मिळुन एकुण रक्कम रु.५,९३,२८०/- देणेत यावी असा

निर्णय देऊन विषयास मंजुरी दिली आहे. त्यानुसार मौजे आकुर्डी येथील मंजुर सुधारित विकास योजनेतील स.नं.१३७/१ पैकी उत्तर - दक्षिण १५.०० मी. रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र २४.०० चौ.मी.साठी येणारे मुल्यांकन र.रु.५,९३,२८०/- (अक्षरी र.रू. पाच लाख त्र्याण्णव हजार दोनशे ऐंशी फक्त) ला व त्यासाठी खरेदीकामी लागणारे मुद्रांकशुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९२९ विषय क्रमांक - ०६

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– जलनि:सारण विभाग

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०६६/२०१८ दि.२५/०६/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.30/5/2017-2018 अन्वये कासारवाडी मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत भोसरी येथील प्रभाग क्र.३४ गव्हाणेवस्ती मध्ये PS1 पंपिंग स्टेशन मध्ये येणारे मुख्य मलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी M/s.CHOTELAL CHAUHAN यांनी नि.र.रू.67,48,193/- (अक्षरी र.रू. सदुसष्ठ लाख अठठेचाळीस हजार एकशे त्र्याण्णव फक्त) पेक्षा 21.22% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रकम रूपये 53,16,226/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३० विषय क्रमांक - ७

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– जलनि:सारण विभाग

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०६८/२०१८ दि.२५/०६/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.21/9/2017-18 अन्वये विशालनगर कल्पतरू चौक ते पिंपळे निलख मैलाशुध्दीकरण केंद्रापर्यंत १००० मी.मी. व्यासाची गुरूत्व वाहीनी टाकणेकामी M/S.M.G.MANE यांनी नि.र.रू.45,00,000/- (अक्षरी र.रू. पंच्चेचाळीस लाख फक्त) पेक्षा 16.01 % कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 37,79,550/- पर्यंत काम करून

घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३१ विषय क्रमांक - ८
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– जलनि:सारण विभाग
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०६५/२०१८ दि.२५/०६/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.6/84/2017-18 अन्वये सांगवी/ दापोडी मैलाशुद्धीकरण केंद्रांतर्गत प्रियदर्शनीनगर, ममतानगर व उर्वरित परिसरात जलनिःसारण नलिका टाकणेकामी M/s. Bhakti Enterprises यांनी नि.र.रू.44,76,572/- (अक्षरी र.रू. चव्वेचाळीस लाख श्याहत्तर हजार पाचशे बहात्तर फक्त) पेक्षा 18.00% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.36,70,789/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३२ विषय क्रमांक - ९
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– जलनि:सारण विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०६७/२०१८ दि.२५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.30/7/2017-2018 अन्वये कासारवाडी मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत स.न.२१७ येथे येणारे मलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी M/s.CHOTELAL CHAUHAN यांनी नि.र.रू.89,97,200/-(अक्षरी र.रू.एकोणनव्वद लाख सत्याण्णव हजार दोनशे फक्त) पेक्षा 28.50% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.64,32,998/- पर्यंत काम

करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३३ विषय क्रमांक - १०

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– ब क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे जा.क्र.बक्षेआ/५/कावि/३८८/२०१८ दि.२१/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

ब क्षेत्रीय कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ अन्वये जुना प्र.क्र.४९, ५०,५१,५३ मधिल कचरा गोळा करणे व हलविणेचे कामकाज करणेसाठी ७ वाहने (टिपर ट्रक) पुरविणेकामी आदेश क्रमांक बक्षेआ/५/कावि/१००७/१६ दि.३१/१२/१६ अन्वये ठेकेदार म्हणून मे.जय गणेश एंटरप्रायझेस यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि मा.आयुक्त सो. यांनी पत्र क्र.आमुका/३/कावि/ ३०७/१७ दि.२४/८/१७ अन्वये वाढती लोकसंख्या, नविन प्रभाग रचनेमुळे कचरा गोळा करणेकामी उपलब्ध असलेल्या वाहनाचा फेर आढावा घेउन वाहने कमी पडत असलेस तात्पुरत्या स्वरुपात आवश्यक वाहने सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडून किंवा अन्य एजन्सीकडून मंजूर निविदा दराने उपलब्ध करुन घ्यावीत असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ चा मंजुर दर मोशी डेपोसाठी र.रु.५१३०/- व भोसरी डेपोसाठी ४९००/- या स्विकृत दरानुसार मे. दीन महिला आधार रोजगार संस्थेने काम करणेची तयारी दर्शविलेने त्यांचेकडून प्र.क्र.१६ येथील चिंतामणी चौक, राजयोग कॉलनी, रेणूका वृदांवन नर्मदा रेसिडेन्सी, कृष्णा पार्क, रेणूका गोविंद, साई व्हिला, साईदर्शन रेणूका तुलसी या ठीकाणचा कचरा गोळा करणे व वाहतूक करून कचरा स्थानांतरण केंद्र भोसरी व मोशी येथील डेपोत टाकणेकामी अतिरीक्त १ टिपर वाहन २ खेपा करणेसाठी दि.०५/०५/१८ पासून ३१/१२/१८ पर्यत अथवा नवीन निवीदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यत या पैकी प्रथम येणा-या तारखे पर्यतच्या र.रू.१२,३१,२००/- (अक्षरी र.रू. बारा लाख एकतीस हजार दोनशे फक्त) अपेक्षीत खर्चास व या खेपा व्यतिरीक्त होणा-या जादा खेपाच्या होणा-या अतिरीक्त खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३४ विषय क्रमांक - ११

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– झोनिपु, स्थापत्य विभाग

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/७५६/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १०) मधील कामाचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३५ विषय क्रमांक - १२

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जा.क्र.मसाभा/२/कावि/५३९/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा दवाखाना/रुग्णालयाकरीता आवश्यक Needle Cutter खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्रं.४२/२०१६-१७ अन्वये लघुत्तम कोटेशन धारक मे.प्राईम सर्जिकल एण्ड फार्मा, चिंचवड, पुणे १९ यांचे Needle Cutter खरेदी करणेकामी प्रति नगा करीता र.रु.१९८०/- इतके लघुत्तम दर प्राप्त झाले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. एकुण २५ नग Needle Cutter खरेदी करणेकामी एकूण र.रु.४९,५००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास हजार पाचशे फक्त) त्यानुसार मे.प्राईम सर्जिकल एण्ड फार्मा, चिंचवड, पुणे यांना आदेश क्रं.मसाभा/२/कावि/१४/२०१७. दि.११/०१/२०१७ अन्वये Needle Cutter एकुण नग २५ नग तातडीने एकुण र.रु.४९,५००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास हजार पाचशे फक्त) मध्ये पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३६ विषय क्रमांक - १३

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जा.क्र.मसाभा/२/कावि/५३८/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत दि.११ जुलै ते २३ जुलै २०१६ दरम्यान अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविणेकामी शासनाने कळविले आहे. याकरीता आवश्यक Tab Zinc Sulphate 20 mg खरेदीकामी कोटेशन नोटीस क्रं.२३/२०१६-१७ दि.०७/०७/२०१६ रोजी प्रसिध्द करणेत आले होते. त्या अनुषंगाने मे.संजय मेडिकल एण्ड जनरल स्टोअर, पिंपरी १८ यांचे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. Tab Zinc Sulphate 20 mg प्रति Tab 0.52/- याप्रमाणे 100000 Tab खरेदी करणेकामी एकुण र.रु.५२,०००/- (अक्षरी र.रु.बावण्ण हजार फक्त) इतका खर्च येत आहे त्यानुसार मे.संजय मेडिकल एण्ड जनरल स्टोअर, पिंपरी १८ यांना आदेश क्रं.मसाभा/२/कावि/३५२/२०१६. दि.११/०७/२०१६ अन्वये Tab Zinc Sulphate 20 mg चे एकुण 100000 Tab तातडीने पुरवठा करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेला खर्च एकुण र.रु.५२,०००/- (अक्षरी र.रु.बावण्ण हजार फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३७ विषय क्रमांक - १४

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ –मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/ड-मुख्य/कावि/१४४/२०१८ दि.२५/०६/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य ड मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २२) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३८ विषय क्रमांक - १५
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– वैद्यकिय मुख्य कार्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ –मा.वैद्यकिय संचालक यांचे जा.क्र.वैद्य/९/कावि/१२६३/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केले प्रमाणे –

राज्य शासनाचे आदेशानुसार दर वर्षी प्रमाणे सन २०१७-१८ मध्ये पल्स पोलिओ लसीकरण मोहिम ११ मार्च २०१८ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेसाठी भाडे तत्वावर वाहने घेण्यासाठी वैद्यकिय विभागाकडील 'एन.यु.एच.एम.' या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.२,७९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख एकोणऐंशी हजार फक्त) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९३९ विषय क्रमांक - १६
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ –मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/११२/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११/०६/२०१८ ते दि.१७/०६/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११२/२०१८ दि.२६/०६/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४० विषय क्रमांक - १७
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– फ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे जा.क्र.फक्षेका/नि-४/कावि/२९९/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी शिफारस केले प्रमाणे –

महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील मे.खाडे कन्स्ट्रक्शन, निविदा क्र.३/७६/२०१७-१८ चा मंजुर ठराव क्र.२१७१ दि.७/२/२०१८ मध्ये निविदा र.रु.६,२४,००३/- ऐवजी

९,२४,००३/- व निविदा खर्च मान्यतेची र.रु.४,९१,५९०/- ऐवजी ७,२७,९३०/- दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४१ विषय क्रमांक - १८

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– मध्यवर्ती भांडार विभाग

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/८/कावि/८८५/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे वैदयकिय विभागासाठी आवश्यक साफसफाई साहित्य पुरवठा करणेकामी ई.नि.सु.क्र.२३/२०१७-१८ अन्वये लघुत्तम निविदाधारक १) मे.दोडके एंटरप्रायजेस यांचे कडील एकुण २७ बाबी साफसफाई साहित्य पुरविणेकामी एकुण र.रु.८००६२७.६० २) मे.स्पेक्ट्रम एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे कडील एकुण २० बाबी साफसफाई साहित्य पुरविणेकामी एकुण र.रु.५२३७३९.२५ ३) मे.कापसे एंटरप्रायजेस यांचे कडील एकुण ०५ बाबी पुरवठा करणेकामी एकुण र.रु.८३२९३.२० असे एकुण १ ते ५२ बाबी करिता एकुण र.रु.१४,०७,६९०/- (अक्षरी र.रु.चौदा लाख सात हजार सहाशे नव्वद फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार तिनही निविदाधारकानां वैदयकिय विभागासाठी आवश्यक साफसफाई साहित्याचा पुरवठा करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकूण र.रु.१४,०७,६९०/- (अक्षरी र.रु. चौदा लाख सात हजार सहाशे नव्वद फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४२ विषय क्रमांक - १९

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– इ क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे जा.क्र.इक्षेका/आ/२/कावि/३४७/२०१८ दि.२७/०६/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शोचालयाचे व मुता-यांची यांत्रिक पद्धतीने (पाण्याच्या उच्चदाब फवा-याचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व देखभाल दुरुस्ती करणेकामी नि.नो.क्र.४/२०१७-१८ अन्वये निविदा र.रु.३५,८१,९५२/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख एक्याऐंशी हजार नऊशे बावन्न फक्त) वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले आहेत. सदरची निविदा दि.१७/२/२०१८ रोजी उघडण्यात आली आहे. सदर

निविदाचे अनुषंगाने मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी अंदाजपत्रकीय र.रु.३५,८१,९५२/- (अक्षरी र.रू. पस्तीस लाख एक्याऐंशी हजार नऊशे बावन्न फक्त) पेक्षा ३५.००% कमी दराने प्राप्त झालेली आहे. याकामी त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस व कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४३ | विषय क्रमांक - २०
दिनांक – १८/०७/२०१८ | विभाग– दुरसंचार विभाग
सूचक – मा.विकास डोळस | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/१/कावि/७३/२०१८ दि.२८/०६/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व मनपाची विविध कार्यालयांस कार्यालयीन कामकाजासाठी मे. आयडीया सेल्युलर लि. यांची ग्रुप मोबाईल सुविधा पुरविणेत येते. सदर कामाची मुदत दि.३०/०६/२०१८ अखेर संपत असून सदर कामाची निविदा प्रक्रिया अंतिम होणेसाठी अंदाजे तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदर निविदेस दि.०१/०७/२०१८ ते ३०/०९/२०१८ अखेर अथवा तीन महिन्याचे आत निविदा अंतिम झालेस त्या तारखे पर्यंत सदर कामास मुदत वाढ देणेस व बिलापोटी होणा-या र.रू.२३ लाख चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४४ | विषय क्रमांक - २१
दिनांक – १८/०७/२०१८ | विभाग– नगरसचिव विभाग
सूचक – मा.यशोदा बोईनवाड | अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/४८२/२०१८ दि.२६/०६/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४५ विषय क्रमांक - २२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– ब क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.बक्षे/लेखा/९/कावि/१९६/२०१८ दि.२१/०६/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.4/9/2017-2018 अन्वये ड प्रभाग अंतर्गत प्रभाग क्र.२२ मधील काळेवाडी व इतर परिसरातील स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरुस्ती व अनुषांगीक काम करणेकामी (२०१७-२०१८) नि.र.रु.9,30,756/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तीस हजार सातशे छपन्न फक्त) पेक्षा -14.01% कमी मे.टॅनजेंट इलेक्ट्रीकल्स अँन्ड कॉन्ट्रक्टर, नागपुर या ठेकेदारांकडून काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी शर्तीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४६ विषय क्रमांक - २३
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– क्रीडा विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७अ/कावि/३४९/२०१८ दि.०७/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०९ दिनांक २५/०६/२०१८ नुसार म.न.पा.चे प्रस्तावात नमुद एकूण १२ जलतरण तलाव (भोसरी तलाव वगळता) पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपल्याने व सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया कार्यवाही चालू असल्याने एकूण १२ जलतरण तलावाचे कामाची मुदत दि.०१/०१/२०१८ ते ई निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड, पुणे १९ यांना १० जलतरण तलाव व मे.सुमित स्पोर्टस अँड फिटनेस इक्विपमेंट चिंचवड, पुणे १९ यांना २ जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४७ विषय क्रमांक - २४
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– क्रीडा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/४२२/२०१८ दि.०८/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १० दिनांक २५/०६/२०१८ नुसार क्रीडा धोरणात एशियन क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे**.** कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हीने ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे तिला र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४८ विषय क्रमांक - २५
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– क्रीडा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/१४९/२०१८ दि.०९/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ११ दिनांक २५/०६/२०१८ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, हॉकी महाराष्ट्र यांच्या मान्यतेने व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हॉकी टूर्नामेंट कमिटी, पुणे यांच्या सहकार्याने महापौर चषक राज्यस्तरीय हॉकी स्पर्धा २०१८ चे आयोजन माहे मे/जून २०१८ मध्ये म.न.पा.च्या मेजर ध्यानचंद पॉलीग्रास हॉकी स्टेडीयम, नेहरूनगर येथे आयोजित करणेस व त्याकामी हॉकी महाराष्ट्र यांनी र.रू.११,९६,९००/- चे अंदाजपत्रकात मागणी केले पैकी म.न.पा. क्रीडा धोरणानुसार हॉकी महाराष्ट्र यांचे नावे करारनामा करून स्पर्धा खर्च र.रू.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर स्पर्धा मे-जुन ऐवजी सप्टेंबर, २०१८ मध्ये आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९४९ विषय क्रमांक - २६
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– क्रीडा विभाग
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७अ/कावि/४३५/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

